"A++" Accredited By NAAC(2021) With CGPA-3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

### शैक्षणिक वर्ष २०२४—२०२५ मधील प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांकरिता पात्रतेसंदर्भातील महत्वाची सूचना

**संदर्भ : —** दि. २३.१२.२०२४ व दि. १८.०६.२०२५ रोजी पात्रतेसंदर्भातील Confirmed – Provisional याद्या

शैक्षणिक वर्ष २०२४—२०२५ मध्ये दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत प्रथम वर्ष बी.ए., बी.कॉम. एम.ए. (भाषा : मराठी, हिंदी व इंग्रजी,) एम.ए. (सामाजिक शास्त्रे : इतिहास, समाजशास्त्र, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र), एम.कॉम., एम.एस्सी. (गणित) व एम.बी.ए. या अभ्यासक्रमांसाठी विविध अभ्यासकेंद्रांमार्फत विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज सादर केलेले होते. अशा विद्यार्थ्यांच्या पात्रतेसंदर्भातील यादी दि. २३.१२.२०२४ व दि. १८.०६.२०२५ रोजी विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आलेल्या होत्या. त्यानंतर काही विद्यार्थ्यांनी पात्रतेसंदर्भातील कागदपत्रे या केंद्राकडे सादर केलेली आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांच्या पात्रतासंदर्भातील कार्यवाही करणेत आली आहे. अद्यापि यामधील काही विद्यार्थ्यांनी प्रवेश व परीक्षा अर्जासोबत पात्रतेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे जमा केलेली नाहीत; याबाबत सर्व विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

१) उपरोक्त अभ्यासक्रमासाठी ज्या विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवेश अर्जासोबत पात्रतेसाठी आवश्यक असणारे स्थलांतर दाखला (टी.सी.)/संस्थांतर दाखला (एम.सी.)/संबंधित विषयाची गुणपत्रके व शेवटची जी परीक्षा दिली त्याचे गुणपत्रक इ. कागदपत्रे सादर केलेली आहेत, अशा विद्यार्थ्यांची पात्रता पूर्ण (Confirmed) झालेली आहे. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी सदर कागदपत्रांची पूर्तता अद्यापि केलेली नाही अशा विद्यार्थ्यांची पात्रता तात्पुरती (Provisional) केलेली आहे. सदरची माहिती विद्यापीठ संकेतस्थळावर Distance Education Link वर पहावयास मिळेल.

२) ज्या विद्यार्थ्यांची पात्रता तात्पुरती (Provisional) केलेली आहे. अशा विद्यार्थ्यांनी उपरोक्त कागदपत्रे या केंद्रात तात्काळ सादर करावीत. सदर विद्यार्थ्यांनी पात्रताबाबतीत कागदपत्रे वेळेत सादर न केल्यास त्याची पात्रता अपूर्ण राहील व त्याचा परिणाम म्हणून प्रवेश व निकालाबाबत अडचणी निर्माण झाल्यास त्यास सर्वस्वी संबंधित विद्यार्थी जबाबदार राहील याची नोंद विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

३) शैक्षणिक वर्ष २०२४—२०२५ मध्ये प्रथम वर्ष उपरोक्त अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना आपल्या प्रवेश अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या आधारे त्यांना Provisional प्रवेश देण्यात आलेले आहेत. सादर करण्यात आलेल्या अर्जासोबत जोडलेली कागदपत्रे चुकीची असल्याचे निदर्शनास आल्यास कोणत्याही टप्प्यावर सदर विद्यार्थ्यांचा प्रवेश रद्द करण्यात येईल. तसेच होणा—या नुकसानीस संबंधित विद्यार्थी स्वत: जबाबदार राहील याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

४) एका विषयातून एम.ए. अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा त्याच विषयातून अभ्यासक्रमास प्रवेश घेता येणार नाही, याची नोंद घ्यावी. अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याचे निदर्शनास आल्यास अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल याबाबत होणा—या आर्थिक व शैक्षणिक नुकसानीस संबंधित विद्यार्थी जबाबदार राहील, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

पान क्र. २ वर

५) एम.कॉम. अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा एम.कॉम. अभ्यासक्रमास प्रवेश घेता येणार नाही, याची नोंद घ्यावी. अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याचे निदर्शनास आल्यास त्या विद्यार्थ्यांचे प्रवेश कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. याबाबत होणा—या आर्थिक व शैक्षणिक नुकसानीस संबंधित विद्यार्थी जबाबदार राहील, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

६) विद्यार्थ्यांनी आपल्या अभ्यासकेंद्रावर स्थलांतर दाखला (टी.सी.)/संस्थांतर दाखला (एम.सी.)/ संबंधित विषयाची गुणपत्रक इ. कागदपत्रे जमा केली असतील व सदरची कागदपत्रे संबंधित अभ्यासकेंद्राकडून या केंद्राकडे विहीत वेळेत जमा केली नसल्यास असा विद्यार्थी अपात्र होवू शकतो. याबाबत विद्यार्थ्यांनी तात्काळ आपल्या अभ्यासकेंद्राशी संपर्क साधून सदरची कागदपत्रे जमा करण्याबाबत कार्यवाही करावी व अभ्यासकेंद्राने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडे जमा केल्याबाबतची खातरजमा करावी.

७) दुहेरी पदवीसाठी प्रवेश घेतलेल्या काही विद्यार्थ्यांनी आपले दुहेरी पदवीसंदर्भातील मुळ अर्ज, शैक्षणिक कागदपत्रे, शुल्क पावती इ.कागदपत्रे अर्जास जोडून नियमित महाविद्यालयाचे प्राचार्य/दूरशिक्षण केंद्राचे समन्वयक यांची स्वाक्षरी व शिक्का घेवून आपले अर्ज सादर केले नसतील अशा विद्यार्थ्यांनी सर्व कागदपत्रांसह वेळेत सादर करावीत.

८) ज्या विद्यार्थ्यांच्या (विशेषत: महिला) सदर प्रवेश अर्जामध्ये सादर केलेल नांव व स्थलांतर दाखला (टी.सी.) /संस्थांतर दाखला (एम.सी.) नावामध्ये बदल झाला असल्यास त्यांनी आवश्यक माहिती तात्काळ सादर करावी. जेणेकरून पात्रतेची कार्यवाही वेळेत करता येईल.

९) ज्या महिला विद्यार्थ्यांच्या नावामध्ये लग्नानंतर बदल झाला असल्यास त्यांनी कार्यालयाचा विहीत नमून्यातील अर्ज भरून त्यासोबत आवश्यक दस्ताऐवज जोडावेत. सदरचे अर्ज व अनुषंगिक कागदपत्रे, शुल्क सादर करून कार्यवाही पूर्ण करून घ्यावी.

१०) ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी पदवीचे शिक्षण दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत पूर्ण केले असल्यास अशा विद्यार्थ्यांनी कार्यालयाचा विहीत नमुन्यातील स्थलांतर दाखला (टी.सी.) अर्ज भरून त्यासोबत आवश्यक दस्ताऐवज जोडून कार्यवाही पूर्ण करून घ्यावी. (उदा. बी.ए. अभ्यासक्रम पूर्ण करून एम.ए. साठी प्रवेश घेतला असल्यास)

सर्व संबंधित विद्यार्थ्यांनी उपरोक्तबाबतची पूर्तता दि.२७.०८.२०२५ पर्यत पूर्ण करावी.

Bhinde 18/08/2025
उपकुलसचिव

जा.क्र.शिवाजी वि./सीडीओई/139/
दिनाकं :18/8/२०२५

प्रत. १) मा.अभ्यासकेद्र प्रमुख/समन्वयक,
सर्व दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण अभ्यासकेंद्रे, कोल्हापूर, सांगली व सातारा.
२) समन्वयक, विभागीय केंद्र, सांगली, सातारा, कोल्हापूर.